# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

२०२१

## प्रेस नोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०४/१०/२०२१

### नवी मुंबई सायबर सेल, गुन्हे शाखा पोलीसांकडुन थ्क। चा अधिकारी असल्याची बतावणी करून मेडीकल दुकानदारांना धमकावुन ऑनलाईन पैसे उकळणा—या सराईत गुन्हेगाराचा शोध घेवुन गुन्हे उघड

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परीसरातील यशवंत केमीस्ट, खारघर व विठठल मेडीकल, उलवे या मेडीकल दुकानदारांस आरोपीताने मोबाईलद्वारे तो एफडीएचा अधिकारी व इन्कम टॅक्स अधिकारी असल्याची खोटी बतावणी करून त्यांचे मेडीकल मधुन एक्सपायरी झालेले लहान मुलांचे सॅरेलेक फुड ग्राहकांना विक्री केले, असा आरोप करून सदर दुकानदारावर एफडीएची कारवाई करून त्यांचे फार्मसी परवाना रदद करण्याची भीती दाखवुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करून अटक करण्याची धमकी दिली. सदरची कारवाई टाळण्यासाठी आरोपीने दिलेल्या विविध पेमेंट वॉलेटमध्ये हजारो रूपयांच्या रकमा ऑनलाईन भरण्यास प्रवृत्त करून फसवणुक केली म्हणुन खारघर पोलीस ठाणे, गु.र.नं.३४०/२०२१, भादंवि कलम १७०,४१९,४२०,३८४,३४ आयटी ॲक्ट ६६(डी) व न्हावाशेवा पोलीस ठाणे, नवी मुंबई गु.र.क्र.१४६/२१ कलम ४१९,४२०,१७०,३४ भा.दं.वि अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

दाखल असलेल्या गुन्हयांचा समांतर तपास नवी मुंबई सायबर सेल गुन्हे शाखेच्या पथकाने आधुनिक तंत्रज्ञान व तांत्रिक कौशल्याचा वापर करून सदरचे गुन्हे करणारा इसम नामे राहुल किरण सराटे, रा.सिध्दार्थ कॉलनी, रूम.न.२ प्लॉट न.५९, एनएसएम गल्ली, चेंबूर पुर्व मुंबई यास निष्पन्न केले. सदरचा आरोपी हा वेळोवेळी मोबाईल, सीमकार्ड व राहण्याचे ठिकाण बदलुन आपले अस्तित्व लपवुन राहत होता. सदर पथकास आरोपी संबंधी मिळालेल्या तांत्रिक माहितीचा बारकाईने अभ्यास करून आरोपी पळुन जाण्याचे तयारीत असताना आरोपीतास हिंजेवाडी, पुणे येथुन ताब्यात घेण्यात आले व त्याच्याकडे चौकशी केली असता तो गुन्हे करताना महिला व पुरूष अधिकारी असे दोघांचे हुबेहुब आवाज स्वत:च काढुन मेडीकल दुकानदारांना धमकावुन घाबरवतो व कारवाई टाळण्यासाठी पैशाची मागणी करतो, असे निष्पन्न झाले आहे. **सदर आरोपीताने खालील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.**

१. खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई गु.र.नं.३४०/२०२१, भादंवि कलम १७०,४१९,४२०,३८४,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
२. न्हावाशेवा पोलीस ठाणे,नवी मुंबई गु.र.क्र.१४६/२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०,३४
३. नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.र.क्र.३१७/२०२०,भा.दं.वि कलम १७०,४१९,४२०,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
४. चेंबुर पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.६००/२०२१ भादंवि कलम १७०,४१९,४२०,३८४,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
५. इस्लामपुर पोलीस ठाणे, सांगली गु.र.क्रं. ६७६/२०२१ भादंवि कलम ४१९,४२०,३४

सदर आरोपीतास खारघर पोलीस ठाणे गु.र.नं.३४०/२०२१ या गुन्हयात दिनांक २४/०९/२०२१ रोजी २३:१० वा. अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास खारघर पोलीस ठाणे करीत आहेत. निष्पन्न केलेला सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द मुंबई शहर, ठाणे शहर, पुणे शहर आणि नागपुर शहर या ठिकाणी एकुण ८ गुन्हे दाखल असुन त्या गुन्हयात तो अटक होता तसेच चेंबुर, मुलुंड (मुंबई), इस्लामपुर (सांगली), खांदेश्वर (नवी मुंबई) या पोलीस ठाणेचे हददीत नमुद आरोपीने गुन्हे केल्याची माहिती प्राप्त होत आहे.

सदरचा सायबर गुन्हा मा.पोलीस आयुक्त, मा.पोलीस सह आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,मा. पोलीस उपआयुक्त,गुन्हे आणि मा. सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर सेल वपोनि/विजय वाघमारे, सपोनि/सागर गवसणे, पोउपनिरी/विजय उपाळे, पोहवा/चौगुले, मपोना/विशाखा पाटील, मपोशि/गडगे, पोशि/अनिकेत पाटील यांनी उघडकीस आणला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तलयातील मेडीकल दुकानदार व इतर आस्थापनाधारक यांना आवाहन करण्यात

येते की, अशा प्रकारे फसवणुक झाली असल्यास सायबर सेल आणि स्थानिक पोलीस ठाणे येथे तात्काळ संपर्क करावा.

———

➢ **अटक आरोपी नामे राहुल किरण सराटे याचा गुन्हयात सहभाग असलेले उघडकीस आणलेले गुन्हे**

१. खारघर पोलीस ठाणे, गु.र.नं.३४०/२०२१, भादंवि कलम १७०,४१९,४२०,३८४,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
२. न्हावाशेवा पोलीस ठाणे, नवी मुंबई गु.र.क्र.१४६/२०२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०,३४
३. नौपाडा पोलीस ठाणे गु.र.क्र.३१७/२०२०,भा.दं.वि कलम १७०,४१९,४२०,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
४. चेंबुर पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.६००/२०२१ भादंवि कलम १७०,४१९,४२०,३८४,३४ आयटी ॲक्ट ६६(डी)
५. इस्लामपुर पोलीस ठाणे, सांगली गु.र.क्रं. ६७६/२०२१ भादंवि कलम ४१९,४२०,३४

➢ **अटक आरोपी नामे राहुल किरण सराटे याचेवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे**

१. चेंबुर पोलीस ठाणे,मुंबई गु.र.क्र. १४/२०१६ भा.दं.वि कलम ४३५,५०६,३४
२. घाटकोपर/मालमत्ता कक्ष, भायखळा, मुंबई गु.र.क्र.३२५/२०१९ भा.दं.वि कलम ४२०,१२०(ब)
३. लष्कर पोलीस ठाणे,पुणे गु.र.क्र.३२५/२०२० भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०
४. हडपसर पो.ठाणे पुणे गु.र.क्र.३५६/२०२१ भा.दं.वि कलम ३८५,४१९,१७०
५. अंधेरी पोलीस ठाणे,मुंबई गु.र.क्र.२३८/२०२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,३४ सह आय.टी. ॲक्ट ६६(क)(ड)
६. बजाजनगर पोलीस ठाणे,नागपुर गु.र.क्र.९८/२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०,३४ सह आय.टी.ॲक्ट ६६(ड)
७. कुलाबा पोलीस ठाणे,मुंबई गु.र.क. २४५/२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०,३४ सह आय.टी. ॲक्ट ६६(ड)
८. कुलाबा पोलीस ठाणे,मुंबई गु.र.क्र.२६२/२१ भा.दं.वि कलम ४१९,४२०,१७०,३४ सह आय.टी.ॲक्ट कलम ६६(ड)

# प्रेस कमिटी

## गुन्हे शाखा, नवी मुंबई.

| अ.क्र. | हुद्दा | नाव | नेमणुक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १. | सपोआ | विनोद चव्हाण | गुन्हे शाखा | |
| २. | पोनि | संध्या भिसे | प्रशासन, गुन्हे शाखा | |
| ३. | पोनि | विजय भोसले | मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा | |
| ४. | पोनि | विजय वाघमारे | सायबर सेल, गुन्हे शाखा | |
| ५. | सपोनि | विजय चव्हाण | वाचक अपोआ गुन्हे, नवी मुंबई | |